भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०३/२०१७

**१) एसटी बस चालकांने मोटार सायकल चालकाला धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०३/२०१७ चे १४.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा भाऊ सहादेव तुकडु बडवाईक वय २७ वर्ष, रा. आंधळगाव हा आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ क्यु २८८१ ने तुमसर कडे जात असता तुमसर कडुन मोहाडी कडे येणाऱ्या आरोपी एसटी बसचे चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे भाऊ याचे मोटार सायकलला शासकीय औद्योगीक प्रशीक्षण केंद्राचे समोर मोहाडी रा. मा. क्र. २७१ वर धडक मारुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी पुरुषोत्तम शिवदास बडवाईक वय ३५ वर्ष, रा. गांधी वार्ड आंधळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चांदेवार पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर चालकांने लापरवाहीने घराला धडक मारुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०९/०३/२०१७ चे २३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सचिन तुलाराम तिघरे वय ३७ वर्ष, रा. वलनी हा आपले घरी झोपले असता यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे घराला धडक मारुन भिंत खचवुन व रस्त्यावरील ईलेक्ट्रीक पोललासुध्दा धडक मारुन पोल वाकवुन ईलेक्ट्रीक तार तोडुन १०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**३) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु व दोघांना गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १०/०३/२०१७ चे ०२.०० वा. दरम्यान यातील मृतक धिरज प्रकाशराव चोपळे वय २४ वर्ष, रा. उमरी व त्याचे नातेवाईक सतीश उर्फ सोमेश कुंडलीक देशमुख वय २९ वर्ष, रा. पवनी, देवीदास महाजन वय ४२ वर्ष, रा. छिंदवाडा सोबत निलज येथे त्याचे मोटर सायकलने जेवन करण्यास गेला असता यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकचे मोटार सायकलला धडक मारुन त्याचे मरणास व त्याचे सोबत असलेले वरील दोन नातेवाईकांस गंभिर जखमी करण्यास कारणीभुत होवुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी कुमारी प्रणाली प्रकाशरावजी चोपडे वय २० वर्ष, रा. उमरी तहसील कांरजा जिल्हा वर्धा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादंवि. सहकलम १३४,१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) ट्रेलर चालकांच्या निष्काळजीपणामुळे सायकल चालकांचे मरणास कारणीभुत होवुन व ऑटो चालकास जखमी केले . :–**

दिनांक १०/०३/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा मुलगा मयुर खेमराज रेवतकर वय १७ वर्ष, हा सायकलने पाणी वाटप करुन घराकडे येत असता यातील आरोपी ट्रेलरचे चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने व लापरवहीने चालवुन फिर्यादीचे मुलाचे सायकलला एनएच ०६ रोडवर तलावाजवळ बेला येथे धडक मारुन मयुर यांचे जागीच मरणास कारणीभुत होवुन व ऑटो क्र. एमएच ३६/ ३०२१ ला धडक मारुन त्याचे चालक संजय गुलाब वालमीक वय ४० वर्ष, रा. नेहरु वार्ड वरठी यास गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी खेमराज हरीकिशन रेवतकर वय ४४ वर्ष, रा. सुभाष वार्ड बेला याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ),३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) जनावरांची डांबुन कोंबुन निर्दयतेची वागणुक देवुन कत्तली करिता वाहतुक व कोणतेही पशुवैधकीय प्रमान पत्र जवळ न बाळगता मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १०/०३/२०१७ रोजी ०५.०० वा. दर. यातील आरोपी क्र. २ चे सांगण्या वरुन आरोपी क्र. १ ने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये ३ गायी, २ बैल, गोरे ५ असे एकुण १० जनावरे कोंबुन डांबुन निर्दयतेची वागणुक देवुन कत्तली करिता नेत असतांना वाहतुक करतांनी व आरोपी क्र. १ने गोवंश संबधी कोणतीही वैध प्रमानपत्र, पशुवैधकीय अधिकाऱ्यांचे प्रमान पत्र जवळ न बाळगता, व चारा पाण्याची व्यवस्था न करता मिळुन आल्याने नमुद जनावरे एकुण किंमती ७०,०००/–रू. व नमुद वाहन किंमती २ लाख रुपये असा एकुण २ लाख ७०,०००/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी नापोशि. हाके वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(१) (ड) (ई), प्राणी निर्दयतेने वागविण्याचा कायदा सहकलम ५(अ) (१)प्राणी संरक्षण कायदा सहकलम ६६/१९२ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १०/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, करडी, तुमसर, सिहोरा व लाखनी येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभटटी दारु + ३७५ सडवा मोहा साहीत्य किंमती २०,८४०/–रु. तसेच ४२ लिटर ६६० मिली लिटर देशी दारु किंमती १४,२२०/–रु. व जुगारातुन किंमती १९०/–रू. असा एकुण किंमती ३५,२५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.